बुधवार, दि १४ मे २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ३४ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## दिल्लीतील पाकिस्तानी अधिकाऱ्याला देश सोडण्याचे आदेश

**नवी दिल्ली -** भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी जाहीर झाली असली तरी या दोन्ही देशांमधील तणाव काही केल्या कमी होत नाही. भारतातील पाकिस्तानी अधिकारी वेगवेगळ्या अवैध कृत्यांमध्ये गुंतले असल्याने त्यांच्यावर आता कारवाई सुरू झाली आहे. नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील एका अधिकाऱ्याला भारताने 'पर्सोना नॉन ग्राटा' घोषित केले असून त्याला २४ तासांच्या आत देश सोडण्याचे आदेश दिले आहेत.

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने जाहीर केले की, नवी दिल्लीतील पाकिस्तानच्या उच्चायुक्त कार्यालयात कार्यरत असलेल्या एका अधिकाऱ्याला 'पर्सोना नॉन ग्राटा' घोषित करण्यात आले आहे. या अधिकाऱ्याने भारतातील त्याच्या राजनैतिक पदाला न शोभणाऱ्या कृत्यांमध्ये भाग घेतल्याने त्याला २४ तासांच्या आत भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कृत्याच्या स्वरूपाबद्दल अधिक माहिती उघड करण्यात आलेली नाही. हा निर्णय भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये वाढत्या तणावाचे संकेत देतो. अधिकृत माहितीनुसार, पाकिस्तानच्या उच्चायुक्त कार्यालयातील हा अधिकारी त्याच्या राजनैतिक पदाला न शोभणाऱ्या कृत्यांमध्ये सहभागी होता. त्यामुळे त्याला 'पर्सोना नॉन ग्राटा' घोषित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये आणखी तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे.

## दहावी परिक्षेत आदीराज शेळके याचे दैदिप्यमान यश

**जालना । प्रतिनिधी -** येथील आदीराज दीपक शेळके यांनी इयत्ता दहावीच्या परिक्षेत ९४.४० टक्के गुण प्राप्त करून दैदिप्यमान यश संपादन केले आहे.



आदींराज शेळके हा बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील चैतन्य गुरुकुल व ज्युनियर कॉलेजचा विद्यार्थी आहे. इयत्ता सातवी पर्यंतचे त्याचे शिक्षण हे जालना येथील श्री.म. स्था. जैन विद्यालयात झाले आहे. आदीराज त्याच्या यशाचे श्रेय हे त्याचे आत्येमामा रविंद्र वायाळ, आत्या रेणुका वायाळ (शेळके) व त्याच्या चैतन्य गुरुकुल येथील शिक्षकांना देतो.

आदीराज यास गणितात ९८, इंग्रजीत ९६, विज्ञान ९४, हिंदी ८८, मराठी ९४ सोशल सायन्स या विषयात ९० गुण मिळाले असून एकूण ५०० पैकी ४७२ गुण मिळवून त्यांने ९४.४० टक्केवारी मिळविली आहे. चैतन्य गुरुकुल व ज्युनियर कॉलेजमध्ये म्हणजेच शाळेतून तो पाचवा आला आहे.

त्याच्या या यशाबद्दल त्याचे चैतन्य गुरुकुलचे शिवकुमार नागपुरे, हर्षवर्धन सावळे, परिहारसर, शारदा जोशी, जयसर आदी शिक्षकगण तसेच दीपक शेळके, रविंद्र वायाळ, रेणुका वायाळ, वर्षा शेळके, भारत बोराडे, उदयराज शेळके, रेखा जाधव, दिलीप कळणे, चंदा केंधळे, साक्षी भुतेकर, भगवान जाधव, उद्धव केंधळे, सुधाकर खरात, केदार गोरे, आनंद जाधव, शितल केंधळे, दिंगबर मानवतकर, प्रविण गोरे, शितल मानवतकर, सोनाली गोरे, मीना काळे-आगळे, कमलताई तुळ्ले, माऊली कळणे, अंकीता बोराडे, संदीप भाकरे यांच्यासह मित्र परिवारातून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### युवा आदर्श
### नातेवाईक ...

अतर्क्य असती कसे
हे विचीत्र नातेवाईक
सर्व डिफेक्टिव्हपीस
बिघाड होई तांत्रिक
नको तेंव्हा गर्दी करी
भलते रे तऱ्हेवाईक
गरजेच्या वेळी गायब
वागे संदिग्ध सांशईक
समज गैरसमज पसरे
छळ करती मानसिक
उखांळ्या पाखाळ्यात
घालवी सारा लौकिक
सल्ले देतात अनाहूत
वाचाळ विचार मौक्तिक
लक्ष खाजगी जीवनात
स्वातंत्र्य घेई वैयक्तिक
सांगावे वाटते आवरावे
नको बुवा तुमची भीक
ज्यात त्यात लुडबुड ती
पुरे करा हो झिकझीक
ओव्हरडोस असह्य हो
पाजत राहता बौद्धिक
निंदानालस्ती भरलेली
डागण्या देती शाब्दिक
सर्वच जागी भेटतात
मनोरूग्ण अनुवंशिक
नाते गोते गोत्या आणे
प्रथा व्यथा पारंपरिक

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## श्रीमती जेबीके विद्यालयाच्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** शहरातील नामांकित नवभारत शिक्षण संस्थेच्या श्रीमती.जे.बी. के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इ१0वी बोर्ड परिक्षेचा निकाल ८२.६४ % लागला असुन, शैक्षणिक वर्षात २१९ विद्यार्थी परिक्षेला प्रविष्ट झाले होते. पैकी १८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून हे प्रमाण ८२.६४%आहे. विद्यालयातुन ९६%गुण घेऊन कु.भक्ती रमेश साळवे हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे ,तर ज्योतिरादित्य गणेश गवळी यांने९२.00% गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला आहे, कु.ज्ञानेश्वरी विठ्ठल साळवे ,व कु.शिवकन्या कृष्णा हिवाळे यांनी ९१.८0%गुण घेऊन तृतिय क्रमांक पटकावला आहे. कु.धनश्री नंदु शेळके,व मंगेश सुधाकर जोशी यांनी ९१.२0%, गुण घेऊन चौथा क्रमांक पटकावला आहे तर,शिवराज गणेश जाधव ८९.८0%गुण घेऊन पाचवा क्रमांक मिळविला आहे. विद्यालयातुन गुणाणुक्रमे उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा नवभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय काबरा, उपाध्यक्ष. जमिर शेख सर, सचिव सत्यनारायण सोनी, कोषाध्यक्ष.सुभाष राठी, जेष्ठ संचालक. ज्येष्ठ संचालक रामनारायण काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी अध्यक्ष सुरेश शेठ काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी सचिव प्रेमसुख काबरा, संचालक तथा माजी सचिव प्रल्हाद टेंभुर्णीकर, संचालक. राजीव काबरा , संचालक दीपक काबरा , संचालक मधुकरराव निकम, संचालक विश्वनाथराव सांगोळे, संचालक तथा प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर , , प्रदीप काबरा, प्रदीप मुळ्ये, प्राचार्य.नंदकुमार काळे, धनंजय पुराणे एस.बी. बोरकर, भिवसन ससाने, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक डॉ अरुण आहेर, प्राध्यापक रामदास भांगे, प्राध्यापक कैलास जाधव, प्राध्यापक जीटी धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव,रमेश इंगळे, विष्णू जाधव, कैलास भूतेकर,संजय कुलकर्णी, समाधान कांबळे,राजेंद्र जगताप,राजेश शेवाळे, .डी. डी.उखर्डे, दत्ता उखर्डे,भिवसन ससाणे,, रवींद्र मोरे, वासुदेव क्षिरसागर, , एफ. ए.शेख, उज्ज्वला आवटी, माधुरी पाटील, मंजुषा भिलावेकर, ज्योतीताई जाधव, विजया लंबे,, राजु डोमळे, नागोराव देशमुख, दगडुबा तांबेकर, दिपक देशमुख आदींनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## राजमाता जिजाऊ सीबीएसई शाळेचा दहावीचा १००% टक्के निकाल; गुणवंतांचा सत्कार




**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** स्थानिक जिजामाता महिला विकास व शिक्षण संस्था जाफराबाद संचलित राजमाता जिजाऊ सीबीएसई स्कूल टेंभुर्णी या शाळेचा इयत्ता दहावीचा २०२४- २५ चा निकाल शंभर टक्के लागला असून यात प्रथम क्रमांक सय्यद मुदस्सीर सय्यद कैसर- ८८.४0%, द्वितीय क्रमांक सय्यद खिजर सय्यद कैसर - ८४.८0%, तृतीय क्रमांक भक्ती संतोष धनवई - ७२.८0% गुण प्राप्त केले आहे. शाळेच्या अध्यक्षा सौ. सुरेखा संजय लहाने आणि संजय लहाने, सुयश लहाने, मुख्याध्यापक संजय फलटणकर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य पंजाबराव लहाने, प्राध्यापक भरत मोरे, संजय कोल्हे, योगेश सवडे, रामेश्वर शिंदे, भागवत लहाने, अमोल तेलंग्रे, घनश्याम गुनावत आदींची उपस्थिती होती.

## ईबीके विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** शहरातील नामांकित श्री महेश शिक्षण संस्थेच्या ई.बी.के उर्दू माध्यमिक विद्यालयाच्या इ१0वी बोर्ड परिक्षेचा निकाल ८९.२८% लागला असुन, विद्यालयातुन सना शाकेर शेख़ हिने प्रथम क्रमांक, अलमास अकबर शेख़ द्वितीय तर पटकावला आहे, आदिल अब्दुल अज़ीज़ शेख़ याने तृतिय क्रमांक पटकावला आहे. विद्यालयातुन गुणाणुक्रमे उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा नवभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देवराव देशमुख, उपाध्यक्ष लक्ष्मण शिंदे, सचिव नंदलाल काबरा, कोषाध्यक्ष अडॉवकेट प्रेमसुख काबरा, संचालक प्रा.दत्तात्रेय देशमुख, ठमाजी भागवत, मुख्याध्यापिका शेख़ सुमैया रोशन, शिक्षक शेख़ साबेर, फकरू कुरेशी, अबरार शेख़, मोहम्मद जुनेद,शेख़ गयास, सय्यद समीर,शेख़ जावेद,सय्यद वसीम,शिक्षकेत्तर कर्मचारी राहुल बोर्डे,गुलाब डहाके, प्रल्हाद मिसाळ, हसन तड़वी, अमोल पांडव आदींनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

युवा आदर्श | जालना | बुधवार, दि १४ मे २०२५ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com



# एका युगाचा अंत!

क्रिकेटचा किंग, चेस मास्टर, विक्रमवीर, रन मशिन यासारखी अनेक बिरुदावली ज्याच्या नावापुढे लागली आहेत तो भारताचाच नव्हे तर जगातील सर्वोत्तम फलंदाज, भारताचा कोहिनूर विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारीत असल्याची घोषणा सोमवारी केली आणि संपूर्ण क्रिकेट विश्व हळहळले. मागील आठवड्यात रोहित शर्मा या भारताच्या माजी कर्णधारानेही कसोटीतून निवृत्ती स्वीकारली होती तेंव्हा पासून विराटच्या निवृत्तीची चर्चा होऊ लागली होती मात्र आगामी इंग्लंड दौऱ्यात विराट खोऱ्याने धावा काढेल आणि मगच कसोटीतून निवृत्त होईल अशी अपेक्षा क्रिकेट चाहत्यांना होती मागील दोन वर्षात विराट कोहली कसोटीत अपेक्षित कामगिरी करू शकला नसला तरी आगमी इंग्लंड दौऱ्यात तो चांगली कामगिरी करून संघाला विजय मिळवून देईल अशी अपेक्षा असतानाच त्याने कसोटीतून निवृत्तीची घोषणा केल्याने क्रिकेट चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. रोहित शर्मा पाठोपाठ विराट कोहलीनेही कसोटी क्रिकेटला रामराम केल्याने भारतीय संघाला त्याचा मोठा फटका बसणार आहे. कारण रोहित आणि विराट या दोघांनी मिळून मागील चौदा वर्षात भारताला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले आहेत. भारतीय क्रिकेटचे जय विरू असलेल्या या दोन ज्येष्ठ खेळाडूंच्या निवृत्तीचे कसोटी क्रिकेटमधील ' रोको ' युग संपले असे म्हणावे लागेल. निवृत्त कधी होणार आहात? , असे विचारण्याआधीच निवृत्ती घेणे योग्य असते असे उदगार दिग्गज कसोटीपटू विजय मर्चंट यांनी निवृत्तीच्या अनुषंगाने काढले होते. कधी जाणार ? असे क्रिकेट चाहत्यांनी विचारण्यापेक्षा का गेलास ? असे विचारणे केंव्हाही चांगले असा विचार करूनच कदाचित या दोघांनी निवृत्ती स्वीकारली असेल. काहीही असो मात्र या दोघांच्या निवृत्तीचे कसोटीतील एका युगाचा अंत झाला असेच म्हणावे लागेल. क्रिकेट या खेळाने जगाला अनेक महान खेळाडू दिले. सचिन तेंडुलकर हा त्यापैकीच एक महान खेळाडू. क्रिकेटमधील दैदिप्यमान कामगिरीने तो क्रिकेटचा देव बनला. जवळपास दोन तप त्याने क्रिकेटवर अधिराज्य गाजवले. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले. २०१३ साली त्याने निवृत्ती स्वीकारली. निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने विक्रमांचे एव्हरेस्ट गाठले. तो निवृत्त झाल्यावर त्याच्या इतक्या क्षमतेचा खेळाडू पुन्हा भारताला मिळेल का ? असाच प्रश्न संपूर्ण क्रिकेट विश्वाला पडला होता. ज्या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नव्हते त्या प्रश्नाचे उत्तर खुद्द सचिनकडे होते. सचिनला जेंव्हा प्रश्न विचारण्यात आला की तुझा विश्वविक्रम कोणता खेळाडू मोडेल असे तुला वाटते तेंव्हा त्याने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले 'विराट कोहली' सर्वांना त्यावेळी ही अतिशोक्ती वाटली पण सचिनने विराटची गुणवत्ता हेरली होती. निवृत्त होण्यापूर्वी चार पाच वर्ष तो आणि विराट एकत्र खेळले होते त्यामुळे विराट कोणत्या क्षमतेचा खेळाडू आहे आणि तो काय करू शकतो हे सचिनला माहीत होते त्यामुळेच सचिनने आपला वारसदार म्हणून विराटची निवड केली होती. विराटने सचिनचे म्हणणे अवघ्या दहा वर्षात खरे करून दाखवले आणि सचिनचा विश्वास सार्थ ठरविला. आज विराटने देखील सचिन प्रमाणे विक्रमांचे इमले चढले आहेत इतकेच नाही तर सचिनचे अनेक विक्रम त्याच्या दृष्टिक्षेपात होते. सचिनच्या १०० शतकांचा विक्रम विराट लवकरच आपल्या नावे करेल असेच सर्वांना वाटत होते त्याच्या नावे ८२ शतके आहेत. कसोटीत त्याने ३० शतके झळकावली आहेत त्यामुळेच त्याच्याकडून ही अपेक्षा व्यक्त केली जात होती आज तो ३७ वर्षाचा होत आहे. त्याचा फिटनेस जबरदस्त आहे. वीस वर्षाचा खेळाडू देखील त्याच्यासमोर फिका पडेल असा त्याचा फिटनेस आहे त्यामुळे तो आणखी दोन तीन वर्ष सहज खेळू शकला असता. त्यामुळे त्याने हा विक्रम सहज मोडला असता मात्र त्याने विक्रमांचा विचार केला नाही. सचिन नंतर सर्वाधिक शतके विराटच्याच नावावर आहेत. विराट केवळ विक्रमवीर बनला नाही तर तो आज जगातला महान फलंदाज बनला आहे. उत्तम खेळाडू ते महान खेळाडू बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास अचंबित करणारा आहे. अवघ्या दहा वर्षात तो आज जगातला महान खेळाडू बनला आहे. त्याने धावांची टांकसाळ उभारली आहे. प्रत्येक सामन्यात तो खोऱ्याने धावा काढत आहे. त्याची बॅट म्हणजे जणू धावांची मशिन, त्याच्या बॅट मधून धावांची बरसात होत आहे म्हणूनच आकाश चोप्रा त्याला ' विराट द रन मशिन कोहली 'असे म्हणतो. त्याने काढलेल्या शतकांपैकी ९५ टक्के शतके भारताच्या विजयास कारणीभूत ठरली आहेत यावरून त्याच्या शतकांचे मोल लक्षात येते. धावांचा पाठलाग करताना तर त्याने सर्वाधिक शतके झळकावली आहेत म्हणूनच त्याला चेस मास्टर असेही म्हंटले जाते. विराटने शतक झळकावले म्हणजे भारत विजयी झाला असेच समीकरण बनले आहे. केवळ शतकच नव्हे तर त्याच्या अनेक छोट्या मोठ्या खेळी भारताला विजय मिळवून देणाऱ्या ठरल्या. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले आहेत. ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेतील पाकिस्तान विरुद्धचा सामना आठवा. आपण तो सामना केवळ विराटमुळे जिंकू शकलो. हातातून गेलेला सामना त्याने ज्याप्रकारे खेचून आणला ते पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. तशी खेळी फक्त आणि फक्त विराटच खेळू शकतो ती खेळी म्हणजे फक्त एक उदाहरण आहे. तशा प्रकारच्या अनेक खेळी करून त्याने भारताला अनेक अशक्यप्राय विजय मिळवून दिले आहेत. कठीण समय येता विराट कामी येई.... असे उगीच क्रिकेटप्रेमी म्हणत नाहीत. भारतीय कसोटी क्रिकेटचा तर खारखरा राजदूत होता. कसोटीत त्याने ३० शतके आणि ३१ अर्धशतके झळकावली आहेत. इतकेच नाही तर कसोटीत त्याने तब्बल ७ द्विशतके झळकावली आहेत. कसोटीत त्याने एकूण ९,२३० धावा काढल्या आहेत त्यात २५४ ही त्याची सर्वोच्च धावसंख्या आहे. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, श्रीलंका, बांगलादेश अशा सर्वच देशात त्याने शतके झळकावली आहेत. केवळ फलंदाज म्हणूनच नाही तर कर्णधार म्हणूनही त्याने देशासाठी सर्वोत्तम कामगिरी केली आहे. भारताचा कसोटीतील सर्वात यशस्वी कर्णधार म्हणून विराटचीच नोंद होते. त्याच्या नेतृत्वाखाली भारताने तब्बल ४० कसोटी सामने जिंकले आहेत. कर्णधार म्हणून त्याने ६८ कसोटीत भारताचे नेतृत्व केले. ६८ कसोटीत ४० विजय मिळवणारा विराट कोहली हा कसोटीतील भारताचा सर्वोत्तम कर्णधार ठरला आहे. त्याच्या नंतर महेंद्रसिंह धोनीचा नंबर लागतो त्याने भारताला २७ कसोटीत विजय मिळवून दिले आहेत. विराटच्या नेतृत्वाखाली भारताने सलग ९ कसोटी मालिका जिंकल्या आहेत. अशी कामगिरी फक्त ऑस्ट्रेलियाच्या रिकी पाँटिंगलाच करता आली आहे. आजच्या टी २० च्या युगात त्याने कसोटी क्रिकेटला नेहमीच प्राधान्य दिले आहे. कसोटी क्रिकेट हेच खरे क्रिकेट असे तो नेहमी म्हणायचा म्हणूनच कसोटीत भारताला विजय मिळावा यासाठी तो सर्वस्व पणाला लावायचा. कसोटी सामना जिंकण्यासाठी जी जिगर लागते जो संयम लागतो तो ग्याच्यकडे होता म्हणूनच तो कसोटी क्रिकेटचा खराखुरा राजदूत होता. त्याची ती जिगर, तो संयम आता पुन्हा दिसणार नाही. पांढऱ्या जर्सी मध्ये तो पुन्हा मैदानात उतरणार नाही याची रुखरुख क्रिकेट चाहत्यांना कायम राहणार आहे असे असले तरी त्याने गेल्या १४ वर्षात भारतीय कसोटी क्रिकेटची जी सेवा केली आहे ती क्रिकेट चाहते कधीही विसरू शकणार नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे,**
**९९२२५४६२९५**

# महाराणा प्रतापसिंह यांचा स्वाभिमान म्हणजे मातृशक्तीची देण - सुनिता चरखा

## लायन्स क्लबतर्फे महाराणी जयवंताबाई एक गौरवशाली माता या विषयावर व्याख्यान

**जालना । प्रतिनिधी -** महाराणा प्रताप हे शूरवीर होतेच, पण त्यांना घडवणाऱ्या मातोश्री जयवंताबाई यांच्या संस्कारांचे मोल अनमोल आहे. महाराणा प्रतापांचा स्वाभिमान म्हणजे मातृशक्तीची देण आहे. प्रतिकूल परिस्थितीतही जे स्वाभिमानाने झुंज देतात, त्यांना इतिहास 'महाराणा' बनवतो, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मोटिवेशनल वक्त्या लॉ. सुनिता चरखा (मुंबई) यांनी येथे बोलताना केले.

लायन्स क्लब ऑफ जालनातर्फे महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त दि. ९ मे रोजी मंठा रोडवरील महेश भवनात महाराणी जयवंताबाई एक गौरवशाली माता या विषयावर आयोजित व्याख्यानात सुनिता चरखा प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लायन्स क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्डा होत्या.



सुनिता चरखा पुढे म्हणाल्या की, जयवंताबाई यांनी आपल्या पुत्रामध्ये लहानपणापासूनच देशभक्ती, स्वाभिमान, त्याग आणि धैर्याची बीजे रुजवली. आजच्या पालकांनीही आपल्या मुलांमध्ये केवळ यशाची आकांक्षा न रुजवता, मूल्यांची पायाभरणी करणे आवश्यक आहे, असे त्या म्हणाल्या.

प्रास्ताविकपर क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्डा यांनी यांनी आजच्या पिढीसाठी ऐतिहासिक व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांवर आधारित सेमिनार आणि भाषणांची नितांत गरज व्यक्त केली.

याप्रसंगी क्लबच्या सचिव मंजू श्रीमाली, कोषाध्यक्ष कल्पना बियाणी, जीएसटी कोऑर्डिनेटर मिनाक्षी दाड, प्रकल्प प्रमुख ड. अर्चना तोतला, डॉ. श्रद्धा होलानी, जयप्रकाश श्रीमाली, बद्रीनारायण बियाणी, विजय दाड, विठोबा दराडे, प्रमोद खरात, मोहन राठोड, मीरा राठोड, सीए नितिन तोतला, अरुण मित्तल, दिनेश चांडक, शंकुतला लड्डा, ज्योती लड्डा, प्रतिक्षा लड्डा, पंकज लड्डा यांच्यासह सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# डॉ. देवेश पाथ्रीकर यांना महात्मा फुले राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित

**बदनापूर । प्रतिनिधी -** अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित ३१ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन ९ व १० मे रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह कराड या ठिकाणी संपन्न झाले. या संमेलनाचे उद्घाटन शरदचंद्र पवार यांच्या हस्ते पार पडले. या संमेलनात जालना जिल्ह्यात मोतीबिंदूमुक्तीसाठी अहोरात्र प्रयत्न करून आरोग्य सेवेत भरीव कार्य केल्याबद्दल तसेच जिल्ह्यात सामाजिक कामात निस्वार्थपणे कार्यरत असलेले निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. देवेश पाथ्रीकर यांना देशभरात मानाचा समजला जाणारा महात्मा फुले राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. देवेश पाथ्रीकर यांनी सामाजिक व आरोग्य संवर्धनाच्या कार्याचा हा मोठा गौरव असून या पूर्वी ही त्याना अनेक राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# शिवकालीन ऐतिहासिक वस्तू आणि शस्त्रांचे जालन्यात प्रदर्शन

## सर्वपक्षीय जयंती उत्सव समितीची माहिती

**जालना । प्रतिनिधी -** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त जालन्यात शिवकालीन ऐतिहासिक वस्तू आणि शस्त्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आल्याची माहिती सर्वपक्षीय छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सचिन कांबळे आणि कार्याध्यक्ष ड. अर्जुन राऊत यांनी आज येथे दिली. हे शस्त्र प्रदर्शन छत्रपती संभाजी उद्यानासमोर (मोतीबाग) बुधवार आणि गुरूवारी (ता. १४ आणि १५ मे २०२५) आयोजिण्यात आले असून नागरिकांनी भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या संदर्भात हॉटेल मधूबनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत अध्यक्ष श्री कांबळे म्हणाले की, धर्मवीर संभाजी महाराज जयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर संभाजी महाराजांच्या विचारांचा प्रचार-प्रसार होण्याच्या दृष्टीने उत्सव समितीच्या वतीने विविध उपक्रम राबविले जात आहेत.

उत्सवानिमित्त बुधवार आणि गुरूवारी (ता. १४ आणि १५ मे) शिवकालीन ऐतिहासिक वस्तुंबरोबरच त्या काळातील प्राचीण शस्त्रांचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. बदलापूर (जि. ठाणे) येथील सुप्रसिध्द अभ्यासक सुनिल कदम यांनी या दोनही दिवसात जालन्यात त्यांच्याकडे असलेली शिवकालीन शस्त्रे तसेच त्या कालावधीतील प्राचीन नाणि, ऐतिहासिक पत्रव्यवहार अशा विविध वस्तुंचे प्रदर्शन भरविण्याची तयारी दाखविली आहे.

यापुवही श्री कदम यांनी विविध शैक्षणिक संस्थांसह ठिकठिकाणी शिवकालीन शस्त्रास्यांच्या प्रतिकृती, त्या काळातील चलनी नाणी, मोडी लिपीतील पत्रे अशा ऐतिहासिक ऐवजांची प्रदर्शने भरविली आहेत. इतिहासाचे अभ्यासक आणि मोडी लिपीचे तज्ञ असलेल्या श्री कदम यांनी दुर्गवीर गडकिल्यांचे छायाचित्र प्रदर्शन यशस्वीरित्या भरविल्याचे सांगून कार्याध्यक्ष ड. राऊत म्हणाले की या निमित्ताने जालनेकर नागरिकांना शिवकालीन इतिहासाचे दर्शन होऊ शकणार आहे.

शिवकालीन शस्त्रांमध्ये खडग किंवा खांडा ही प्राचीन भव्य तलवार, धोप नावाची वैशिष्ट्यपूर्ण मराठा तलवार, पट्टा नामक दुधारी तलवार, अग्नीजन्य पदार्थ वापरून तयार केलेले दगडी तोफगोळे, विविध प्रकारचे भाले, ढाली, चिलखत, कथ्यारी, बाण, वाघनखे अशी ऐतिहासिक शस्त्रास्त्रे या दोन दिवसीय प्रदर्शनात पहायला मिळणार आहेत.

पत्रकार परिषदेस निमंत्रक करण जाधव, सहकार्याध्यक्ष कपील खरात, निमंत्रक मंगेश मोरे, उपाध्यक्ष शुभम राजगुरे, सागर फेरपत्रेवार, किरण शिरसाठ, प्रशांत खरात, सहसचिव ऋतुराज कदम, आकाश जगताप, अनिल रत्नपारखे, बालासाहेब देशमुख, ड. सुनिल काळे, योगेश सोळुंके अन्य उपस्थित होते.

# जलतारा प्रकल्प गावागावात; महाजनशक्ती देणार साथ - जोशी

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्यात शासनाच्यावतीने दुष्काळमुक्तीसाठी विविध प्रकारे योजना राबविल्या गेल्या परन्तु दुष्काळ काही मुक्त झाला नाही. यादरम्यान मराठवाड्याचे भूमिपुत्र असलेले जलनायक डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी 'जलतारा' प्रकल्पाची सुरुवात केली आणि पहिल्या टप्यात २०० गावे पाणीदार झाली हा स्तुत्य उपक्रम त्यांनी शासनाच्यादारी मांडला आणि या उपक्रमाला शासकीय योजनेत आणले गेले. आता ही योजनेची योग्यदृष्टीने अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्यस्तरीय समिति केलेली आहे. जिल्ह्याजिल्ह्यात कार्यशाळा आयोजन केले जाते.

यात सरपंच-ग्रामविकास अधिकारी-ग्रामसेवक यांसह विविध विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षित केले जाते. यानंतर होतो जलतारा प्रकल्पाचा शुभारंभ आणि प्रकल्पाचे कार्य पूर्ण झाल्यानंतर १००% पाणीपातळीत वाढ होताना दिसून येते आहे. या जलतारा प्रकल्पाला शासकीय योजनेत समाविष्ट केल्यामुळे आर्थिक भार कोणत्याही शेतकऱ्यांवर पडणार नाही याची काळजी घेतली गेली आहे. महाराष्ट्र राज्यभर 'जलतारा' प्रकल्प गावागावात राबविण्यासाठी महा'जनशक्ती' परिषद सामाजिक कार्यासाठी भक्कम साथ देण्यास सज्ज असणार आहे.

पंचायतराज विकास मंच व अखिल भारतीय सरपंच परिषद,महाराष्ट्र यांच्या सहयोगाने पुढील १ महिन्यात सरपंचांसाठी राज्यस्तरीय 'जलतारा' प्रकल्पाची विशेष कार्यशाळा आयोजन करण्यात येणार आहे. सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

# स्वाभिमानाची प्रेरणा देणारा छावा महाप्रतापी धर्मवीर संभाजी महाराज

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ.स.१६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला.राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला. संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला.या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले. परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते.याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले.त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली.औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा सर्वत्र पसरवून मोगलांच्या डोळ्यात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्रात सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला.शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसातच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला. त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही.कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.१६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता.कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला.त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला.त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.१६८९ च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.परंतु आपल्याच लोकांनी विश्वासघात केला व संभाजी महाराजांच्या स्थानाची माहिती मोगलांना दिली.यात गणोजी शिर्के हे महाराजांचे मेहुणे होते व कान्होजी शिर्के हे दोघेही छत्रपती संभाजी महाराजांचे जवळचे नातेवाईक होते.परंतु वतनाच्या मुद्द्यावरून त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा विश्वासघात केला.यालाच म्हणतात घर का भेदी लंका ढाये१ फेब्रुवारी इ.स.१६८९ रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला.मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली.मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही.त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला. परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत.पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले.औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली.परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही.संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली. तरीही औरंगजेबाची कोणतीही अट मानण्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली.औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत रहाले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रुरतेची हद पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रूरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही?याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती.शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात. संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, आरोग्य , शिक्षण इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे जनतेला (प्रजेला) सुख-समाधान प्राप्त होईल.कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुंण्यायीमुळेच. हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे.याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे.धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पीत आहे व शोषण करीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल. आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण -शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची संपूर्ण खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा. हर हर महादेव!

**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

### जागतिक मागणीनुसार रोजगारक्षम मनुष्यबळ तयार करण्यासाठी कौशल्य विकास विभागाचे नवे पीपीपी धोरण

# आयटीआयला जागतिक दर्जाच्या केंद्रात रूपांतरित करणाऱ्या धोरणाला शासनाची मंजुरी

**मुंबई** - महाराष्ट्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना (आयटीआय) जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण संस्थांमध्ये रूपांतरित करून उद्योगांच्या गरजेनुसार अत्याधुनिक प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने कौशल्य, रोजगार आणि नाविन्यता विभागाने तयार केलेल्या सार्वजनिक-खाजगी भागीदारी अर्थात पीपीपी धोरणाला आज राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या धोरणामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षण, संस्थेतील पायाभूत सुविधा, जागतिक दर्जाच्या कंपन्यांमध्ये थेट उमेदवारी प्रशिक्षण आणि कंपन्यांच्या भागीदारीमुळे प्रशिक्षणार्थींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणाऱ्या रोजगाराच्या जागतिक संधी उपलब्ध होणार आहेत. सदर धोरणामार्फत काळानुरूप, नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम शिकवले जातील आणि २ लाख आयटीआय विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री श्री मंगल प्रभात लोढा यांनी मंत्रालयात वार्ताहर कक्षात पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले. यावेळी अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा देखील उपस्थित होत्या.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) ह्या राज्याच्या व्यवसायिक शिक्षण प्रणालीचा अविभाज्य भाग राहिल्या आहेत. या संस्थांना आता खऱ्या अर्थाने जागतिक औद्योगिक प्रशिक्षणाचे केंद्र बनवून महाराष्ट्रात कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी अर्थात पीपीपी धोरणाची गरज असल्याचे कौशल्य, रोजगार आणि नाविन्यता विभागाचे मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी मंत्रिमंडळ बैठकींनंतर स्पष्ट केले.

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात आयटीआयने कुशल मनुष्यबळ पुरवून आतापर्यंत मोठे योगदान दिले आहे. मात्र आता जागतिक उद्योगांच्या गरजेनुसार अत्याधुनिक प्रशिक्षित उमेदवारांची नितांत गरज भासू लागली आहे. अनेक संस्थांच्या पायाभूत सुविधांचा प्रश्न आहे. तसेच काही अभ्यासक्रमात त्रुटी आहेत. आर्थिक मर्यादा यासारख्या आव्हानांचा सामना या संस्थांना करावा लागत असून या संस्थांना पुनर्जीवित करून भविष्यातील गरजा ओळखून कुशल मनुष्यबळ तयार करणे आवश्यक आहे.

असे असेल पीपीपी धोरण अग्रगण्य कॉर्पोरेट्स, औद्योगिक संघटना, परोपकारी व्यक्तींना अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी, अत्याधुनिक जागतिक प्रशिक्षण सुविधा प्रदान करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. तसेच उद्योगांना कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (उडठ) द्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सहभाग वाढवला जाईल.



१. १० वर्षे (किमान १० कोटी रुपये) आणि २० वर्षे (किमान २० कोटी रुपये ) २. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) धोरणात्मक भागीदार (स्ट्रॅटेजिक पार्टनर) म्हणून काम करणार आहे. ३. ग्रामीण भागात गरज पडल्यास निविदा काढून वायबिलिटी गॅप फंड (व्हीजीएफ) प्रणालीचा पर्याय म्हणून वापर करता येईल. ४. आयटीआयला त्यांचे स्थान, मूल्यांकन आणि संभाव्यतेच्या आधारे तीन याद्यांमध्ये विभागले जाईल. ५. आयटीआयच्या जागेची आणि इमारतीची मालकी सरकारकडे राहील. ६. आयटीआयबाबत सरकारची धोरणे कायम राहतील. ७. शिक्षक कर्मचाऱ्यांसह कर्मचारी कायम राहतील. तथापि, अतिरिक्त अभ्यासक्रमासाठी अतिरिक्त कर्मचारी भागीदार उद्योगाद्वारे नियुक्त केले जाऊ शकतात. ८. नवीन भागीदारांना उपकरणे, साहित्य खरेदी आणि नूतनीकरण / बांधकामास परवानगी दिली जाईल. सरकारी निविदा प्रक्रियेचे पालन न करता खुल्या बाजारातून ते हे करू शकतात. ९. प्रत्येक आयटीआयमध्ये एक पर्यवेक्षण समिती (आयएमसी) असेल जिथे नवीन येणारा भागीदार अध्यक्ष असेल तर सचिव आयटीआयचे प्राचार्य / उपप्राचार्य किंवा सरकारने नियुक्त केलेली व्यक्ती असेल. १०. यासंदर्भात कोणताही वाद मिटविण्यासाठी राज्यस्तरीय संचालन समिती असेल. ११. आयटीआयमध्ये भागीदार उद्योगाकडून शिक्षण किंवा रोजगार संबंधित कार्यक्रम वगळता इतर कोणत्याही क्रियाकलापांना परवानगी दिली जाणार नाही. उद्योग कॉर्पोरेट यांच्या सामाजिक जबाबदारी (उडठ) अंतर्गत कर सूट, यासारख्या शासकीय प्रोत्साहनाची बदल्यात उपकरणे, पायाभूत सुविधा, बांधकाम, प्रशिक्षक आणि निदेशक यांचे प्रशिक्षण इत्यादीमध्ये गुंतवणूक करू शकतील. १२. उद्योगासह गुंतवणुकीद्वारे इमारत दुरुस्ती, अत्याधुनिक प्रयोगशाळा, स्मार्ट वर्ग खोल्या आणि डिजिटल शिक्षण सुविधा उभारण्यात येतील. पहिल्या टप्प्यात राज्यातील किमान २५ औद्योगिक प्रशिक्षण संस्था निवडण्यात येतील, त्यानंतर प्रायोगिक उपक्रमांचा आढावा घेऊन १०० प्रशिक्षण संस्था पीपीपी धोरणात समाविष्ट केल्या जातील.

१३. औ.प्र.संस्था उद्योग भागीदारांसह संयुक्त प्रमाणपत्र प्रशिक्षण कार्यक्रम राबवतील. हे अभ्यासक्रम राष्ट्रीय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषद (छउतएढ), महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ (चडइडतएढ) व रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांच्याशी संलग्न असतील. अभ्यासक्रमात प्रशिक्षण नोंदणीकृत प्रशिक्षणार्थी आणि बाह्य उमेदवारांनाही प्रशिक्षण देण्यात येईल. शासनातील अंतर्गत नियमानुसार प्रशिक्षणार्थींना प्रतिपूर्ती देण्यात येईल. तर बाह्य उमेदवारांना हे प्रशिक्षण शुल्क भरावे लागेल.

**बदलते अभ्यासक्रम**

१. पीपीपी धोरणामुळे विद्यार्थ्यांना जागतिक औद्योगिक प्रशिक्षणाची संधी, २. ख, सायबर सुरक्षा, ए लर्निंग प्लॅटफॉर्म, ॲडीटिव्ह मॅनुफॅक्चरिंग, आय ओ टी आणि रोबोटिक्स आणि हरित ऊर्जा सारख्या जागतिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेता येईल. ३. विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात प्रभावी असलेल्या उद्योग समूहांचा समावेश असल्याने सेंटर ऑफ एक्सलन्स संकल्पना राबवण्यात येईल. पुणे आणि छत्रपती संभाजी नगरमध्ये ऑटोमोबाईल कंपन्या अधिक असल्याने तिथे सेंटर ऑफ एक्सलन्स सेंटर विकसित केले जाऊ शकते. त्यामुळे तिथल्या प्रकल्पांच्या गरजेनुसार प्रशिक्षणार्थींना रोजगाराची संधी उपलब्ध होईल. ४. प्रात्यक्षिक ज्ञानावर अधिक भर, उद्योगांच्या अनुषंगाने आवश्यक कुशल मनुष्यबळ तयार होण्यास मदत प्रशिक्षणार्थींना स्टार्ट अप्ससाठी मार्गदर्शन, कार्यक्षेत्र आणि निधी सहाय्य प्रदान करणारे कॅम्पस आणि विविध रोजगार मेळाव्यांचे आयोजन त्यात थेट कंपन्यांचा सहभाग ५. महिलांचा सहभाग वाढवण्यावर भर, कंपन्यांकडून महिलांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातील. ६. औद्योगिक प्रशिक्षण संस्था (खपर्वीीीू रश्रळसपशव) उद्योग संरेखित मॉडेल अन्वये कार्यरत राहील आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मनुष्यबळ पुरवण्यास अधिक सामर्थ्यशील होईल. ७. प्रशिक्षणार्थींना रोजगाराची संधी निर्माण करण्यासाठी पीपीपी तत्वावर चालवण्यात येत असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतच जॉब प्लेसमेंट सेल स्थापन करण्यात येईल.

सार्वजनिक -खाजगी भागीदारीवर (झझझ) शासनाचे संपूर्ण नियंत्रण १. प्रत्येक भागीदारी केलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेवर व्यवस्थापन समितीचे लक्ष राहील २. उद्योग भागीदारांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला प्रदान केलेली उपकरणे आणि सेवांवर त्यांचा कोणताही मालकी हक्क राहणार नाही. यावर शासनाचा हक्क राहील. ३. खाजगी उद्योग संथानी निर्माण केलेल्या पायाभूत सुविधा शासनाच्याच अधीन असतील. त्याठिकाणी उद्योग संस्था खाजगी कार्यालय स्थापित करू शकत नाहीत. ४. उद्योग भागीदारीचा परिणाम म्हणून संबंधित संस्थेचे नाव बदलले जाऊ शकत नाही. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या परवानगीने परिसरातील काही ठिकाणी उद्योगाचे नाव प्रदर्शित करण्याची परवानगी देण्यात येईल. ५. उद्योग भांडवली खर्च (उ-झएद) आणि परिचालन खर्च (जझएद) दोन्हीमध्ये उद्योग समूहांचा खर्च ६. राज्य सुकाणू समिती उद्योग भागीदारांना प्रशिक्षण संस्थेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींचे निराकरण करेल. ७. भागीदाराने कोणत्याही वेळी शासकीय अधिनियम, नियम तसेच करारात नमूद अटी व शर्तींचा भंग केल्यास त्यांच्या कामगिरी समाधानकारक नसल्यास, त्यांचे कार्य शासकीय प्रशिक्षण संस्थेच्या हिताच्या विरुद्ध आढळून आल्यास करार रद्द करण्याबाबत राज्य सुकाणू समिती निर्णय घेईल.

महाराष्ट्रातील सार्वजनिक-खाजगी (पीपीपी) भागीदारी धोरणाद्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची उन्नती करणे. उद्योगाच्या मागणीनुसार सुसंगत कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी भागीदारी धोरण हे एक ऐतिहासिक पाऊल आहे. या धोरणामुळे महाराष्ट्रात जागतिक दर्जाचे कौशल्य केंद्र स्थापन करण्याचे उद्दिष्ट दृष्टीपथात आहे. त्याचबरोबर रोजगारक्षमता वाढवण्यासोबतच राज्याच्या आर्थिक वृद्धीस देखील यामुळे योगदान मिळणार असून, सहयोगाने हे आदर्श उदाहरण ठरणार आहे. पीपीपी तत्वावर महाराष्ट्रात प्रगत औद्योगिक केंद्रांची उभारणी झाल्यास कुशल मनुष्यबळाचे महाराष्ट्र हे जागतिक स्तरावरील आदर्श मॉडेल म्हणून नावारूपाला येऊ शकेल.





